सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५

# महाराष्ट्र जनजातींच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम, १९७६

( दिनांक १० एप्रिल १९८७ पर्यंत सुधारलेला )

# Maharashtra Act No. V of 1977

# Maharashtra Tribals, Economic Condition (Improvement) Act, 1976

( *As modified upto 10th April 1987* )

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांनी भारतात मुद्रित केले व संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, मुंबई-४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

१९८७

( किंमत रु. २.६० पैसे )

# महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम १९७६

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| प्रस्ताविक. | १ |
| कलमे | |
| १. संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व विराम. | १ |
| २. व्याख्या. | २ |
| ३. हा अधिनियम, नियम इत्यादी इतर अधिनियमितींशी विसंगत असले तरी ते परिणामक असणे. | ४ |
| ४. जनजातीतील व्यक्तींना रोखीने किंवा वस्तूरूपाने कर्ज देणे. | ४ |
| ५. विनिर्दिष्ट कृषिउपजाचे पणन व वाहतूक करण्यास मनाई. | ५ |
| ६. अभिकर्त्याची नेमणूक. | ६ |
| ७. विनिर्दिष्ट उपजा खरेदी किंमत निश्चित करण्याचा राज्य शासनाचा किंवा त्याच्या अभिकर्त्याचा अधिकार. | ७ |
| ८. विनिर्दिष्ट उपज राज्य शासनाने, जनजाति प्राधिकाऱ्याने किंवा अभिकर्त्याने खरेदी करणे व त्याची विक्री करणे. | ७ |
| ९. विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० प्रवर्तनात असणे. | ७ |
| १०. (वगळण्यात आले). | |
| ११. प्रवेश, झडती, अभिग्रहण इत्यादींचा अधिकार. | ८ |
| १२. अपराध व शास्ती. | ८ |
| १३. अपराधांची दखल घेणे इत्यादी. | ९ |
| १४. या अधिनियमाच्या तरतुदींचे प्रवर्तन निलंबित ठेवण्याचा अधिकार. | ९ |
| १५. अधिकारांचे प्रत्यायोजन. | १० |
| १६. दायित्वनिराकरण. | १० |
| १७. प्रत्येक अधिकारी, अभिकर्ता किंवा त्याचा कर्मचारी अथवा उप-अधिकर्ता हा, लोकसेवक असणे. | १० |
| १८. नियम. | १० |
| १९. सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक आठ याचे निरसन व व्यावृत्ती. | ११ |
| अनुसूची. | ११ |

# सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५[१]

## [ महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम १९७६ ].

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६ अन्वये सुधारणा करण्यात आली. † §

**महाराष्ट्र राज्यातील जनजातीतील व्यक्तीच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास चालना देण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम**

**ज्याअर्थी** भौगोलिक दृष्टचा व सामाजिक दृष्टचा अलग पडल्यामुळे जनजातीतील व्यक्तींना जे आर्थिक व सामाजिक मागासलेपणाचे जीणे कंठावे लागत आहे ते लक्षात घेता जनजातीतील व्यक्तींच्या आर्थिक स्थितीत शक्य तितक्या अल्पावधीत, प्रभावीपणे सुधारणा घडवून आणणे आवश्यक वाटते;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अध्यादेश, १९७६ याच्या प्रारंभापूर्वी घेण्यात आलेले कोणतेही कर्ज आरंभापासून विधिअग्राह्य व शून्यवत् ठरवणे आणि त्यांना कोणतेही कर्ज देण्यास खाजगी अभिकरणांना मनाई करणे आणि राज्यातील जनजाति क्षेत्रांमध्ये खाजगी अभिकरणांद्वारे करण्यात येणाऱ्या विवक्षित कृषिउपजाच्या पणनास मनाई करणे व केवळ राज्य शासन आणि अन्य विनिर्दिष्ट अभिकरणांच्या मार्फत कर्ज देण्यास परवानगी देणे व राज्य शासनामार्फत आणि अन्य विनिर्दिष्ट अभिकरणांच्यामार्फत अशा उपजाच्या पणनासाठी अशा क्षेत्रांमध्ये योग्य ती पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देणे आणि त्याच्याशी संबंधित इतर बाबींची तरतूद करणे, यांद्वारे, समाजातील विवक्षित तत्त्वशून्य घटकांकडून केल्या जाणाऱ्या पिळवणुकी-पासून त्यांचे रक्षण करणे ही, अशी प्रभावी आर्थिक सुधारणा घडवून आणण्याच्या उपाययोजनांपैकी एक उपाययोजना होती;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

१९७६ चा महा. अध्या. ८ — **आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजने साध्य करण्यासाठी राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे ज्यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात होती याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अध्यादेश १९७६ हा, दिनांक ९ ऑक्टोबर, १९७६ रोजी प्रख्यापित केला;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधान मंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे आणि तसेच यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी त्यात विवक्षित इतर तरतुदी करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** आता भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, व्याप्ती, [२][ प्रारंभ व विराम],**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अधिनियम, १९७६ असे म्हणावे.

---

† कलम २, ३ (ब), ५ (ड) आणि ७ खेरीज संपूर्ण अधिनियम १९ सप्टेंबर १९७७ रोजी अंमलात आला असल्याचे आणि कलम २, ३ (ब), ५ (ड) आणि ७ ही २३ सप्टेंबर १९७७ रोजी अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल (सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६ याचे कलम १ (२) पहा. )

§ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६, कलम ९ अन्वये सन १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सात निरसित करण्यात आला.

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९७६ भाग पाच अतिरिक्त पृष्ठ क्रमांक ६२३–६३७ (इंग्रजी) पहा.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६, कलम २ (क) अन्वये "व प्रारंभ" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) (अ) हे कलम, कलम २ व कलम ४ ची पोट-कलमे (१) व (४) यांमधील तरतुदी आणि त्या तरतुदींशी आनुषंगिक किंवा सहाय्यभूत असतील अशा या अधिनियमातील इतर तरतुदी राज्यातील सर्व जनजाति क्षेत्रांत दिनांक ९ ऑक्टोबर १९७६ रोजी अंमलात आल्या असल्याचे मानण्यात येईल.

(ब) या अधिनियमातील इतर सर्व तरतुदी दिनांक ९ ऑक्टोबर १९७६ रोजी प्रथमत: धुळे जिल्ह्याच्या नवापूर तालुक्यात आणि अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट तालुक्यात अंमलात आल्या असल्याचे मानण्यात येईल.

(क) राज्य शासनास, या अधिनियमातील ज्या तरतुदी या पोट-कलमाच्या खंड (अ) आणि (ब) अन्वये अंमलात आल्या नसतील अशा तरतुदी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ते नेमील अशा इतर जनजाति क्षेत्रांत व अशा तारखेपासून [1][अंमलात] आणता येतील; आणि निरनिराळ्या जन-जाति क्षेत्रांच्या संबंधात निरनिराळ्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी निरनिराळ्या तारखा नेमता येतील.

[2][ (४) (अ) पोट-कलम (३) च्या खंड (ब) व (क) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही वेळी, राज्य शासनाने तसे करणे ज्यामुळे आवश्यक झाले आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्या-बद्दल राज्य शासनाची खात्री झाली तर राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे उक्त खंड (ब) आणि (क) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या, या अधिनियमाच्या ज्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी कोणत्याही जनजाति क्षेत्रामध्ये अंमलात आल्या असल्याचे मानण्यात येत असेल किंवा अंमलात आणण्यात आल्या असतील त्या तरतुदी अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून, पण अशा तारखेपूर्वी उक्त तरतुदीअन्वये केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या संबंधात असेल ते खेरीज करून, त्या क्षेत्रामध्ये अंमलात असण्याचे बंद होईल असा निदेश देता येईल.

(ब) या पोट-कलमाच्या खंड (अ) अन्वये राज्य शासनाने, अशा कोणत्याही तरतुदी कोणत्याही जनजाति क्षेत्रांमध्ये अंमलात असण्याचे बंद होईल असा निदेश दिलेला असेल अशा बाबतीत, जर त्यानंतर कोणत्याही वेळी परिस्थितीमध्ये बदल झालेला आहे व तसे करणे आवश्यक आहे याबद्दल राज्य शासनाची खात्री झाली तर राज्य शासनास तशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे, अंमलात अस-ण्याचे बंद झालेल्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी त्या जनजाती क्षेत्रांमध्ये, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून पुन्हा अंमलात येतील असा निदेश देता येईल.]

व्याख्या.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर—

[3][ (अ) "कृषि उपज" म्हणजे अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला सर्व उपज (मग त्यावर प्रक्रिया केलेली असो किंवा नसो) आणि त्यामध्ये, राज्य शासन जनजातीच्या व्यक्तींच्या हिताच्या दृष्टीने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये वेळोवेळी भर घालील असा कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, मत्स्यसंवर्धन यापासून उपजा व वनापासून मिळणारा उपज, या अन्य उपजाचा (मग त्यावर प्रक्रिया केलेली असो किंवा नसो) समावेश होतो. राज्य शासनास जनजातीच्या व्यक्तींच्या हिताच्या दृष्टीने, तशाच अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, कोणताही कृषिउपज अनुसूचीमधून वगळता येईल; ]

(ब) "नियत तारीख" याचा अर्थ—

(एक) कलम १ च्या पोट-कलम (३) खंड (अ) आणि (ब) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या कोणत्याही क्षेत्रांच्या आणि तरतुदींच्या संबंधात ९ ऑक्टोबर १९७६ असा होतो. [4] * * *

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६ कलम २ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (अ) दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) (एक) अन्वये "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

(दोन) कलम १ च्या पोट-कलम (३), खंड (क) अन्वये जेथे या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्यात आल्या असतील अशा इतर कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात त्या खंडाखालील अधिसूचनेद्वारे नेमण्यात आलेली तारीख.

[१] [(तीन) कलम १, पोट-कलम (३) च्या खंड (ब) आणि (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या इतर तरतुदींच्या संबंधात, जर कोणत्याही जनजाति क्षेत्रात उक्त तरतुदींपैकी सर्व किंवा कोणत्याही तरतुदी अंमलात असण्याचे बंद झाले असेल आणि त्या कलम १ च्या पोट-कलम (४) खंड (ब) अन्वये पुन्हा अंमलात आणल्या असतील तर कलम १, पोट-कलम (४) च्या खंड (ब) खालील अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेली तारीख;]

(क) "विहित" म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित;

[२] [(क-अ) कोणत्याही कृषिउपजाच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीने केलेली "फुटकळ विक्री" म्हणजे, त्या व्यक्तीकडून त्या मालाची दिवसातून केवळ एकदाच आणि ती देखील कितीही परिमाणात केली जाणारी विक्री—मग ती विक्री वजनी असो, मापी असो, किंवा नगावर किंवा अन्यथा असो—आणि अशी विक्री, राज्य शासनाकडून त्या कृषिउपजाच्या संबंधात **शासकीय राजपत्रात** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा फुटकळ विक्रीच्या मर्यादे बाहेर नसलेल्या कोणत्याही परिमाणातील असेल व अशा कोणत्याही कृषिउपजाच्या संबंधात अशी मर्यादा विनिर्दिष्ट करण्यात येईतोपर्यंत ज्याची विक्रीची किंमत दहा रुपयांपेक्षा अधिक होणार नाही अशा मालाची कोणत्याही परिमाणातील विक्री असेल आणि "फुटकळ खरेदी" या तत्सम संज्ञेचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल,

(ड) "अनुसूचित जमाती" म्हणजे भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जमाती असल्याचे मानण्यात आलेल्या जमाती किंवा जनजाति समूह अथवा अशा जमातीतील किंवा जनजाति समूहातील भाग किंवा गट आणि उक्त अनुच्छेद ३४२ अन्वये काढलेल्या संविधान (अनुसूचित जमाती) आदेश, १९५० याच्या अनुसूचीच्या भाग-सात-क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमातींच्या किंवा जनजाति समूहांच्या किंवा अशा जमातीतील किंवा जनजाति समूहातील भागाच्या किंवा गटाच्या असणाऱ्या परंतु त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्राच्या रहिवासी नसलेल्या आणि तरीसुद्धा ज्यांना याअधिनियमानुसार संरक्षणाची गरज आहे (आणि, त्यांना अशा संरक्षणाची गरज आहे असे याद्वारे जाहीर केले आहे अशा व्यक्तींना या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अनुसूचित जमातीच्या व्यक्तींप्रमाणे त्याच रीतीने वागविण्यात येईल;

(ई) "जनजातीतील व्यक्ती" म्हणजे अनुसूचित जमातीची असणारी व्यक्ती आणि त्यात तिच्या, जनजातीतील व्यक्ती असणाऱ्या, हितसंबंधी उत्तराधिकाऱ्याचा समावेश होतो;

(फ) "जनजाति क्षेत्र" म्हणजे, राज्यातील अनुसूचित क्षेत्रे व ज्या कोणत्याही क्षेत्रात असणारी जनजातीतील व्यक्तींची लोकसंख्या किंवा जेथे जनजातीतील व्यक्तींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या असतील किंवा करण्याचे योजिले असेल असे क्षेत्र आणि राज्य शासनास योग्य वाटतील असे इतर घटक यांचा विचार करून राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी इतर क्षेत्रे;

**स्पष्टीकरण** :—(१) "अनुसूचित क्षेत्रे" म्हणजे, भारताच्या संविधानाच्या पाचव्या अनुसूचीच्या परिच्छेद ६ च्या उप-परिच्छेद (१) अन्वये काढण्यात आलेल्या अनुसूचित क्षेत्रे (भाग "क" राज्य) आदेश, १९५० किंवा यथास्थिति अनुसूचित क्षेत्रे (भाग "ख" राज्ये) आदेश, १९५० (त्या त्या वेळी अंमलात असलेला असा प्रत्येक आदेश) अन्वये अनुसूचित क्षेत्रे म्हणून जाहीर केलेली महाराष्ट्रातील क्षेत्रे.

(२) "लोकसंख्या" म्हणजे जिची तात्पुरती किंवा अंतिम अशी संबद्ध आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे अशी निकट पूर्ववर्ती जनगणनेअनुसार निश्चित करण्यात आलेली लोकसंख्या;

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६ कलम ३ (ब) दोन अन्वये उपखंड (तीन) जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (क) अन्वये खंड (क–अ) समाविष्ट करण्यात आला.

(ग) "जनजाति प्राधिकारी" म्हणजे, राज्याचा जनजाति आयुक्त म्हणून नेमण्यात आलेला अधिकारी आणि त्यात, राज्य शासनाने या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदीअन्वये जनजाति प्राधिकाऱ्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(ह) या अधिनियमात वापरण्यात आलेले, परंतु यात व्याख्या न करण्यात आलेले शब्द व शब्दप्रयोग यांना महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ यामध्ये त्यांना अनुक्रमे नेमून देण्यात आलेले अर्थ असतील. (१९७६ चा महा. अधि. क्रमांक ३.)

हा अधिनियम, नियम इत्यादी इतर अधिनियमितींशी विसंगत असले तरी ते परिणामक असणे.

३. या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अधिनियमातील किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही अधिनियमांच्या सामर्थ्याने अंमलात असलेल्या कोणत्याही संलेखात या अधिनियमाशी किंवा तदन्वये केलेल्या नियमांशी किंवा दिलेल्या आदेशांशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा दिलेल्या आदेशांच्या तरतुदी परिणामक असतील.

जनजातीतील व्यक्तींना रोखीने किंवा वस्तुरूपाने कर्ज देणे.

४. (१) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा अशा कोणत्याही कायद्याच्या सामर्थ्याने अंमलात असलेली कोणतीही संविदा किंवा इतर संलेख यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या कोणत्याही प्रयोजनांसाठी कोणत्याही तारणाखेरीज किंवा कोणत्याही मालमत्तेच्या तारणावर कोणत्याही व्यक्तीकडून जनजातीच्या व्यक्तीस नियत तारखेपूर्वी, देण्यात आलेले रोख किंवा वस्तुरूपाने दिलेले कर्ज हे आरंभापासूनच विधिअग्राह्य व शून्यवत् असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानंतर महाराष्ट्र ऋणग्रस्ततेपासून मुक्तता अधिनियम, १९७५ च्या तरतुदी ज्याप्रमाणे त्या अधिनियमान्वये पूर्णपणे फेड झाली असल्याचे मानण्यात येणाऱ्या कर्जांना लागू होतात त्याचप्रमाणे अशा विधिअग्राह्य व शून्यवत् कर्जांना लागू होतील. (१९७६ चा महा. अधि. क्रं. ३)

**स्पष्टीकरण :**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, "जनजातीतील व्यक्ती" याचा अर्थ एकतर सीमांतिक शेतकरी, ग्रामीण कारागीर किंवा मजूर असणारी [1][आणि नियत तारखेला, आयकर अधिनियम, १९६१ अन्वये करपात्र नसेल अशी] किंवा जी नियत तारखेला ९ हेक्टरपेक्षा अधिक नसेल एवढी कोरडवाहू जमीन किंवा ३ हेक्टरपेक्षा अधिक नसेल एवढी बारमाही ओलिताखालील जमीन धारण करीत असेल ती व्यक्ती. जेव्हा जनजातीतील व्यक्ती कोरडवाहू जमीन तसेच बारमहा ओलिताखालील जमीनसुद्धा धारण करीत असेल त्याबाबतीत ओलिताखालील एक हेक्टर जमीन ही तीन हेक्टर कोरडवाहू जमिनीच्या बरोबर समजली जाईल. तसेच तीन हेक्टर कोरडवाहू जमीन ही एक हेक्टर ओलिताखालील जमिनीच्या बरोबर समजली जाईल.

(२) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीने नियत तारखेनंतर जनजातीतील व्यक्तीला कोणत्याही प्रयोजनासाठी एकतर कोणत्याही तारणाशिवाय किंवा कोणत्याही मालमत्तेच्या तारणावर रोख रकमेत किंवा वस्तुरूपाने कोणतेही कर्ज देता कामा नये किंवा कोणत्याही जनजातीतील व्यक्तीला कर्जाची परतफेड होईपर्यंत रोज सेवाचाकरी करण्यासाठी किंवा शारीरिक श्रम करण्यासाठी किंवा दोन्हींसाठी बांधून घेता कामा नये आणि कोणत्याही व्यक्तीने नियत तारखेस किंवा त्यानंतर जनजातीतील व्यक्तीला असे कोणतेही कर्ज दिले असेल तर ते आरंभापासूनच विधिअग्राह्य व शून्यवत् असल्याचे मानण्यात येईल आणि असे कोणतेही कर्ज कोणत्याही मालमत्तेच्या तारणावर देण्यात आले असेल तर तशी मालमत्ता ताबडतोब जनजातीतील त्या व्यक्तीच्या स्वाधीन करण्यात येईल.

(३) मालमत्तेची मागणी ही वादग्रस्त असेल तर ते खेरीज करून एरव्ही ती मालमत्ता ताबडतोब स्वाधीन करण्यात आली नाही तर, अशा मालमत्तेचा ताबा स्वाधीन करण्यास भाग पाडण्यासाठी जनजातीतील व्यक्तीला, पोलीस आयुक्त असेल तेथे पोलीस आयुक्तास व अन्यत्र जिल्हा दंडाधिकाऱ्यास

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६, कलम ४ अन्वये "नियत दिनांकाला जिचे सर्व मार्गांनी मिळणारे निव्वळ उत्पन्न दरसाल रु. ८,००० पेक्षा अधिक होत नाही" या मजकुराऐवजी वरील मजकूर कायम दाखल केल्याचे मानण्यात येऊ लागले.

किंवा पोलीस अधीक्षकास विनंती करता येईल. पोलीस आयुक्त जिल्हा दंडाधिकारी किंवा, यथास्थिति, पोलीस अधीक्षक मालमत्तेचा ताबा जनजातीतील व्यक्तीच्या स्वाधीन करून देण्यासाठी वाजवीरीत्या आवश्यक असतील अशा उपाययोजना करील किंवा करण्याची तजवीज करील किंवा असे बल वापरील किंवा वापरण्याची तजवीज करील.

**स्पष्टीकरण** :—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी—

(अ) "पोलीस आयुक्त" यामध्ये, त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या, पोलीस निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो;

(ब) "जिल्हा दंडाधिकारी" यामध्ये, त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या, तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो; आणि

(क) "पोलीस अधीक्षक" यामध्ये, त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो.

(४) पोट-कलमे (१) व (२) यामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट राज्य शासनाने किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही महामंडळाने किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याने, सहकारी संस्थेने, स्थानिक प्राधिकरणाने किंवा कोणत्याही बँकेने कोणत्याही जनजातीतील व्यक्तीला दिलेल्या त्या पोट-कलमात उल्लेख केलेल्या कोणत्याही कर्जास लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण** :—या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी—

१९६१ चा२४. (१) "सहकारी संस्था" म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेली किंवा नोंदणी केल्याचे मानण्यात येणारी संस्था;

(२) "बँक" म्हणजे—

१९४९ चा१०. (अ) बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली बँक व्यवसाय कंपनी;

१९५५ चा२३. (ब) भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ याखाली रचना केलेली भारतीय स्टेट बँक;

१९५९ चा३८. (क) भारतीय स्टेट बँक ( दुय्यम बँका ) अधिनियम, १९५९ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली दुय्यम बँक;

१९७० चा ५. (ड) बँक व्यवसायी कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० अन्वये रचना केलेली तत्सम नवीन बँक;

१९७६ चा२१. (ई) प्रादेशिक ग्रामीण बँका अधिनियम, १९७६ याखाली रचना केलेली प्रादेशिक ग्रामीण बँक;

१९६३ चा१०. (फ) कृषि पुनर्वित्त व्यवस्था व विकास महामंडळ अधिनियम, १९६३ याखाली रचना केलेले कृषि पुनर्वित्त व्यवस्था व विकास महामंडळ;

१९४९ चा१०. (ग) बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ५१ खाली केंद्र सरकारने अधिसूचित केलेली इतर कोणतीही बँक व्यवसाय परिसंस्था;

विनिर्दिष्ट कृषिउपजाचे पणन व वाहतूक करण्यास मनाई

५ [1][ (१) त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून—

(अ) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा जनजाती क्षेत्रातील अशा कृषिउपजाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश अनुक्रमे "विनिर्दिष्ट उपज" व

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६, याच्या कलम ५ (अ) अन्वये पोट–कलम (१) दाखल करण्यात आले.

"विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्र" असा केला आहे.) कोणत्याही उत्पादकाने किंवा उपज आधी गोळा करणाऱ्याने नियत तारखेनंतर अशा विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रातील असा विनिर्दिष्ट उपज रोखीने किंवा वस्तूरूपाने किंवा इतर कोणत्याही रीतीने, राज्य शासन किंवा जनजाति प्राधिकारी किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अभिकर्ता यांच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीला विकता कामा नये;

(ब) राज्य शासन, जनजाति प्राधिकारी किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला अभिकर्ता यांच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने उत्पादकांकडून किंवा उपज आधी गोळा करणाऱ्याकडून कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रातील कोणताही विनिर्दिष्ट उपज खरेदी करता कामा नये.

(२) राज्य शासनास किंवा जनजाति प्राधिकाऱ्यास अशा विनिर्दिष्ट उपजाची विक्री करणाच्या प्रयोजनासाठी असा विनिर्दिष्ट उपज एकत्र जमवण्यासाठी लेखी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये संग्रह केंद्रे उघडता येतील. राज्य शासन किंवा जनजाति प्राधिकारी असा आदेश जनतेच्या माहितीसाठी त्यास योग्य वाटेल अशा पद्धतीने प्रसिद्ध करील.

(३) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये कोणत्याही विनिर्दिष्ट उपजाची विक्री करण्याची [1][कोणत्याही उत्पादकाची किंवा उपज आधी गोळा करणाऱ्याची] इच्छा असेल अशा बाबतीत ती व्यक्ती असा सर्व उपज फक्त, पोट-कलम (२) खाली त्या प्रयोजनासाठी स्थापन केलेल्या संग्रह केंद्रामध्येच देईल.

[2][ (४) कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये कोणत्याही विनिर्दिष्ट उत्पादकाने किंवा उपज आधी गोळा करणाऱ्याने केलेल्या कोणत्याही फुटकळ विक्रीला किंवा अशा क्षेत्रातील अशा उपजाच्या कोणत्याही उत्पादकांपैकी किंवा उपज आधी गोळा करणाऱ्यांपकी कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कोणत्याही फुटकळ खरेदीस पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. ]

(५) ज्यावेळी पोट-कलम (१) खालील कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्राच्या संबंधात कोणताही कृषिउपज अधिसूचित करण्यात आला असेल त्यावेळी राज्य शासन, जनजाति प्राधिकारी किंवा [3][राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेला] अभिकर्ता याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीला राज्य शासनाच्या किंवा जनजाति प्राधिकाऱ्याच्या परवानगीने असेल त्याखेरीज, अशा कोणत्याही विनिर्दिष्ट उपजाची, अशा जनजाति क्षेत्रातून त्या क्षेत्राबाहेरील कोणत्याही ठिकाणी किंवा त्याउलट वाहतूक करता येणार नाही किंवा वाहतूक करण्याचा प्रयत्न करता येणार नाही.

अभिकर्त्यांची नेमणूक.

६. (१) राज्य शासनास, कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये कोणत्याही विनिर्दिष्ट उपजाच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या प्रयोजनांसाठी आदेशांद्वारे त्या आदेशांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा जनजाति क्षेत्राच्या संबंधात अभिकर्त्यांची नेमणूक करता येईल. असे अभिकर्ते किंवा त्यांचे उप अभिकर्ते म्हणजे एकतर, राज्यामध्ये त्या त्यावेळी अंमलात असलेल्या व सहकारी संस्थांच्या संबंधातील कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केल्याचे मानण्यात येणाऱ्या अशा सहकारी संस्था किंवा कोणत्याही शासनाच्या किंवा अशा सहकारी संस्थेच्या मालकीचे, नियंत्रणाखालील किंवा त्याने/तिने वित्तव्यवस्था केलेले कोणतेही महामंडळ किंवा परिसंस्था किंवा संघटना असेल.

(२) अभिकर्ते किंवा उप अभिकर्ते यांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येतील, अशा असतील.

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६, कलम ५(ब) अन्वये "कोणत्याही व्यक्तीची" याऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ५(क) अन्वये पोट-कलम (४) बदली दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ड) अन्वये "त्याने प्राधिकृत केलेल्या" या मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

**विनिर्दिष्ट उपजाची खरेदी किंमत निश्चित करण्याचा राज्य शासनाचा किंवा त्याच्या अभिकर्त्याचा अधिकार.**

७. (१) राज्य शासन किंवा त्याने या बाबतीत प्राधिकृत केलेला त्याचा अभिकर्ता कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये असा विनिर्दिष्ट उपज राज्य शासनाकडून किंवा त्याच्या वतीने ज्या किंमतीस खरेदी करण्यात येईल ती किंमत निश्चित करील व ती किंमत राज्य शासनाकडून ठरविण्यात येईल अशा रीतीने प्रसिद्ध करील.

परंतु किंमती वेळोवेळी ठराविक काळाने किंवा आवश्यक वाटेल, तेव्हा निश्चित करता येतील अथवा त्यामध्ये सुधारणा करता येतील आणि भिन्नभिन्न विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रांमध्ये किंवा त्यांच्या भागांमध्ये वेगवेगळ्या विनिर्दिष्ट उपजासाठी किंवा त्याच्या कोणत्याही प्रतीसाठी किंवा जातीसाठी वेगवेगळ्या किंमती निश्चित करता येतील आणि तसे करताना इतर गोष्टींबरोबर पुढील गोष्टी विचारात घेण्यात येतील —

(अ) भारत सरकारने स्थापन केलेल्या कृषि मूल्य आयोगाच्या शिफारशीनुसार निश्चित करण्यात आलेली त्या विनिर्दिष्ट उपजाची किंमत;

(ब) त्या विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये काढण्यात येणाऱ्या विनिर्दिष्ट उपजाची प्रत; आणि

(क) प्रत्येक प्रकरणातील परिस्थितीअनुसार आवश्यक असतील अशा इतर बाबी;

(२) अभिकर्ते किंमती निश्चित करतील किंवा त्यात सुधारणा करतील तेव्हा त्यांनी, शासनाने या बाबतीत वेळोवेळी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचेदेखील अनुपालन केले पाहिजे.

(३) कोणत्याही कृषिउपजाचा (विनिर्दिष्ट उपज असलेल्या) साठा धारण करणाऱ्या व्यक्तींना त्याची एका विनिर्दिष्ट किंमतीस राज्य शासनास विक्री करण्यास फर्माविणाऱ्या, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ खाली काढलेल्या कोणत्याही आदेशान्वये अशा कृषिउपजांच्या
१९५५ संबंधात निश्चित केलेल्या किंमतीवर, पोट-कलमे (१) आणि (३) यांमधील कोणत्याही गोष्टींचा
चा१०. परिणाम होणार नाही;

**विनिर्दिष्ट उपज राज्य शासनाने, जनजाति प्राधिकाऱ्याने किंवा अभिकर्त्याने खरेदी करणे व त्याची विक्री करणे.**

८. (१) राज्य शासन, जनजाति प्राधिकारी किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेला अभिकर्ता, विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये विक्रीसाठी देऊ करण्यात आलेला कोणताही विनिर्दिष्ट उपज कलम ७ खाली निश्चित केलेल्या किंमतीस खरेदी करण्यास बांधलेला असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये विनिर्दिष्ट उपज खरेदी केल्यानंतर, राज्य शासन तो उपज अशा विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये किंवा अशा क्षेत्राबाहेर साठवून ठेवण्यासाठी व अशा कोणत्याही क्षेत्रातील खुल्या बाजारात अशा उपजास जी किंमत येऊ शकेल अशा किंमतीस अशा क्षेत्रामध्ये अशा उपजाच्या विक्रीसाठी योग्य ती सर्व व्यवस्था करील; आणि त्या प्रयोजनासाठी राज्य शासनास प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीत त्यास योग्य वाटेल अशी उपाययोजना करता येईल किंवा करविता येईल.

**विनिर्दिष्ट जनजाती-क्षेत्रामध्ये सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० प्रवर्तनात असणे.**

९. (१) या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये कोणत्याही विनिर्दिष्ट कृषिउपजाच्या पणनास मनाई करण्यात आली असेल आणि असे जनजाति क्षेत्र हे महाराष्ट्र कृषि उपज पणन (नियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे). याखालील बाजार क्षेत्राचा एक भाग असेल तर—

(अ) या अधिनियमामध्ये अन्यथा विनिर्देशपूर्वक तरतूद केलेली असेल त्याव्यतिरिक्त विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामधील विनिर्दिष्ट उपजाचे पणन हे, उक्त अधिनियमाखाली अशा बाजार क्षेत्राकरिता स्थापन केलेल्या बाजार समितीच्या पर्यवेक्षणाच्या व नियंत्रणाच्या अधीन असेल आणि त्या प्रयोजनासाठी त्या बाजार समितीस राज्य शासनाचे कोणतेही निदेश, नियंत्रण व अनुदेश असल्यास, त्यांच्या अधीन राहून, उक्त अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली तरतूद करण्यात येतील असे अधिकार वापरता येतील व अशी कार्ये करता येतील आणि अशी कर्तव्ये पार पाडता येतील.

(ब) कलम ५ पोट-कलम (४) द्वारे तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून, नियत तारखेपासून ३ महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने विहित करण्यात येईल अशा रीतीने तिची नोंदणी झालेली नसेल तर, जनजातीतील व्यक्तींच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये कोणत्याही कृषिउपजाचे पणन करता कामा नये किंवा अशा कोणत्याही कृषिउपजाच्या संबंधात व्यापारी म्हणून काम करता कामा नये.

(क) एखादे विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्र हे एकापेक्षा अधिक बाजार समित्यांच्या अधिकारितेमध्ये मोडत असेल तर, राज्य शासन, तसे करणे इष्ट असेल तर लेखी आदेशाद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशी एकच बाजार समिती या कलमान्वये अशा विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रात कार्य करील.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (ब) खाली नोंदणी करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीने विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये तिने केलेल्या कृषिउपजाच्या पणनासंबंधीची विहित करण्यात येईल अशी माहिती व अशी विवरणपत्रे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत जनजाति प्राधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजेत.

१०. [किमत चढउतार निधी] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६ याच्या कलम ६ अन्वये वगळण्यात आले.

प्रवेश, झडती, अभिग्रहण इत्यादींचा अधिकार.

११. (१) फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा आदेशांच्या तरतुदींचे अनुपालन करून घेण्याच्या दृष्टीने किंवा उक्त तरतुदींचे अनुपालन करण्यात आले आहे याबद्दल स्वतःचे समाधान करून घेण्यासाठी—

(एक) कोणत्याही कृषिउपजाच्या वाहतुकीसाठी वापरलेल्या किंवा वापरण्याचा इरादा असलेली कोणतीही व्यक्ती, जनावर, वाहन, जहाज किंवा पात्र थांबवून घेता येईल आणि त्याची झडती घेता येईल;

(दोन) कोणत्याही वास्तूमध्ये प्रवेश करता येईल आणि तिची झडती घेता येईल;

(तीन) ज्याच्या संबंधात या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या किंवा आदेशांच्या तरतुदीचा भंग करण्यात आला आहे, करण्यात येत आहे किंवा केला जाण्याच्या बेतात आहे, असे त्याला/तिला सकारण वाटत असेल, अशा कृषिउपजाचे, तो ज्या पात्रामध्ये असेल त्या पात्रासह किंवा असा कृषिउपज वाहून नेण्यासाठी वापरलेले जनावर, वाहन किंवा जहाज यांच्यासकट अभिग्रहण करता येईल.

(२) या कलमान्वये करण्यात आलेली कोणतीही झडती किंवा अभिग्रहण हे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदींअनुसार करण्यात येईल.

अपराध व शास्ती.

१२. (१) कलम ४, पोट-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करून, जी कोणतीही व्यक्ती, त्या पोट-कलमामध्ये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, जनजातीतील कोणत्याही व्यक्तीला कोणतेही कर्ज देईल तिला अपराधसिद्धीनंतर, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कैदेची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(२) कोणतीही व्यक्ती कलम ५ च्या तरतुदींचे उल्लंघन करून, जाणूनबुजून, उद्देशपूर्वक किंवा अन्यथा कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये कोणत्याही विनिर्दिष्ट उपजाची विक्री करील किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट उपजाची कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रातून अशा क्षेत्राबाहेरील कोणत्याही ठिकाणी किंवा त्या उलट वाहतूक करील किंवा वाहतूक करण्याचा प्रयत्न करील—

(अ) तिला अपराधसिद्धीनंतर,—

(एक) पहिल्या अपराधाबद्दल, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कैदेची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील;

(दोन) दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल, दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कैदेची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(ब) जिच्या संबंधात कलम ५ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्यात आलेले असेल अशी कोणतीही मालमत्ता किंवा न्यायालयाला योग्य वाटेल असा तिचा कोणताही भाग, ती मालमत्ता जिच्यामध्ये सापडली असेल असे कोणतेही पुडके, आवरण किंवा पात्र यांसह आणि ती मालमत्ता वाहून नेण्यासाठी वापरलेले कोणतेही जनावर, वाहन, जहाज किंवा इतर वाहन यांसह राज्य शासनाकडे जमा करण्यात येईल.

परंतु संपूर्ण मालमत्ता, किंवा यथास्थिति त्या मालमत्तेचा कोणताही भाग किंवा कोणतेही पुडके, आवरण किंवा पात्र किंवा कोणतेही जनावर, वाहन, जहाज किंवा इतर वाहन यांच्या संबंधात अभिग्रहण करण्याचे निदेश देण्याची आवश्यकता नाही, असे न्यायालयाचे मत असेल तर त्याला कारणे नमूद करून तसे करण्यापासून परावृत्त राहता येईल.

(३) जी कोणतीही व्यक्ती, कलम ९, पोट-कलम (१), खंड (ब) च्या तरतुदींचे उल्लंघन करून स्वत:ची नोंदणी करून घेण्यात कसूर करील किंवा त्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये माहिती किंवा विवरणपत्रे देण्यात कसूर करील, तिला अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कैदेची किंवा शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**अपराधांची दखल घेणे इत्यादी**

१३. (१) कोणतेही न्यायालय राज्य शासनाच्या किंवा त्याने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय या अधिनियमाखालील कोणत्याही शिक्षापात्र अपराधाची दखल घेणार नाही.

१९७४ चा २. (२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेले सर्व अपराध दखलपात्र व जामीनयोग्य असतील.

**या अधिनियमाच्या विवक्षित तरतुदींचे प्रवर्तन निलंबित ठेवण्याचा अधिकार.**

१४. (१) या अधिनियमाचे एखादे प्रयोजन लक्षात घेता त्याच्या विवक्षित तरतुदींची एखाद्या विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये एखाद्या विनिर्दिष्ट उपजाच्या संबंधात अंमलबजावणी करणे विवक्षित कालावधीसाठी [१] * * * असमयोचित आहे असे राज्य शासनाचे मत असेल, तर राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे [२] अशा विनिर्दिष्ट उपजाच्या संबंधात आणि विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये जितका [१] * * * * * इष्ट असेल आणि अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी किंवा कालावधींसाठी त्या तरतुदींचे प्रवर्तन निलंबित ठेवता येईल; आणि त्यानंतर, अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या बाबतीत असेल त्याव्यतिरिक्त अशा जनजाति क्षेत्रामध्ये आणि अशा विनिर्दिष्ट उपजाच्या संबंधात त्या तरतुदी निलंबित राहतील.

(२) कोणत्याही विनिर्दिष्ट उपजाच्या संबंधात, कोणत्याही विनिर्दिष्ट जनजाति क्षेत्रामध्ये पोट-कलम (१) खालील अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही एक किंवा अनेक कालावधींसाठी या अधिनियमाच्या तरतुदींचे प्रवर्तन निलंबित करण्यात आले असेल, आणि [२] * * * असा किंवा असे विनिर्दिष्ट कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी राज्य शासनाचे असे मत असेल [३] [की, अशा विनिर्दिष्ट जनजाती क्षेत्रातील त्या एखाद्या विनिर्दिष्ट उपजाच्या संबंधात या तरतुदींचे (किंवा त्यांपैकी कोणत्याही तरतुदीचे) पुनरुज्जीवन करणे आणि त्या प्रवर्तनात आणणे इष्ट आहे तर निलंबनाची अशी कोणतीही अधिसूचना तशाच प्रकारच्या अधिसूचनेद्वारे

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६, कलम ७(अ) अन्वये "अनावश्यक किंवा" हा आणि "आवश्यक किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७(ब) (एक) अन्वये "त्यानंतर किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अंशत: किंवा पूर्णत: रद्द करता येईल; आणि त्यानंतर, ज्या तरतुदी निलंबित करण्यात आल्या असतील आणि ज्यांचे पुनरुज्जीवन करण्यात आले असेल अशा तरतुदी अशा विनिर्दिष्ट उपजाच्या संबंधात अशा विनिर्दिष्ट क्षेत्रामध्ये दुसऱ्या अनुसूचीच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून पूर्णपणे परिणामक असतील.

(३) कोणत्याही तरतुदींचे प्रवर्तन पोट-कलम (१) खाली निलंबित केल्याने त्याचा निलंबित न केलेल्या तरतुदींवर परिणाम होणार नाही; आणि अधिसूचित केलेल्या जागी किंवा राज्य शासनाने त्या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही जागी निलंबनाच्या कालावधी पूर्वी दिलेल्या कोणत्याही विनिर्दिष्ट उपजाच्या (किंवा निलंबनाच्या कालावधीमध्ये स्वेच्छेने देण्यात येईल अशा उपजाच्या) संबंधात या अधिनियमाच्या सर्व तरतुदी लागू असणे चालू राहील किंवा जणू काही कोणत्याही तरतुदी निलंबित करण्यात आल्या नसल्याप्रमाणे त्याना त्या लागू असतील.

**अधिकारांचे प्रत्यायोजन.** १५. राज्य शासनास **शासकीय राज्यपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की या अधिनियमाखाली किंवा तदन्वये केलेल्या नियमांखाली किंवा आदेशाखाली त्याने वापरण्याजोगा असलेला कोणताही अधिकार (कलम १४ खालील या अधिनियमाच्या तरतुदींचा अंमल निलंबित करण्याचा अधिकार किंवा कलम १८ खालील नियम करण्याचा अधिकार या व्यतिरिक्त) जनजाती प्राधिकाऱ्याला किंवा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दर्जापेक्षा कमी दर्जा नसणाऱ्या, राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यालादेखील तीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास त्या शर्तींवर, वापरता येण्याजोगा असेल.

**दायित्व-निराकरण** १६. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमान्वये किंवा आदेशान्वये, सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करावयाचे उद्देशिलेल्या कोणत्याही कृतीबद्दल राज्य शासनाविरुद्ध किंवा जनजाती प्राधिकाऱ्याविरुद्ध किंवा अभिकर्त्याविरुद्ध किंवा अधिकाऱ्याविरुद्ध किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**प्रत्येक अधिकारी, अभिकर्ता किंवा त्याचा कर्मचारी अथवा उप अभिकर्ता हा, लोकसेवक असणे.** १७. या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये काम करणारा राज्य शासनाचा प्रत्येक अधिकारी किंवा त्याचा अभिकर्ता आणि अशा अभिकर्त्याचा प्रत्येक कर्मचारी किंवा उप अभिकर्ता हा भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. (१८६० चा ४५)

**नियम.** १८. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. अशा नियमांत या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी फी आकारणे व तिचा परतावा देणे यांबाबत तरतूद करता येईल.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेले सर्व नियम हे ते प्रथमच करण्यात आले असतील त्याखेरीज, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधान-मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात

कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा यथास्थिति येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यांमुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

१९७६ चा महा. अध्यादेश आठ.

सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक आठ याचे निरसन व व्यावृत्ती.

१९. (१) महाराष्ट्र जनजातीच्या व्यक्तींची आर्थिक स्थिती (सुधारणे) अध्यादेश, १९७६ याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झालेले असले तरी याप्रमाणे निरसित केलेल्या अध्यादेशानुसार केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (यात केलेली कोणतीही नेमणूक, दिलेला प्राधिकार किंवा काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांचा अंतर्भाव आहे) ही या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदींअनुसार करण्यात, काढण्यात किंवा यथास्थिति देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

## [1][अनुसूची

[कलम २ (अ) पहा.]

| | |
|---|---|
| १. गहू | १३. मसूर |
| २. भात (तूस काढलेले आणि तूस न काढलेले) | १४. भुईमूग (न सोललेले) |
| ३. ज्वारी | १५. जवस |
| ४. बाजरी | १६. तीळ |
| ५. नागली | १७. एरंडी |
| ६. वरी | १८. कारळे |
| ७. लाल मिरच्या | १९. हिरडा |
| ८. तूर | २० डिंक |
| ९. हरभरा | २१ लाख |
| १०. उडीद | २२. मोहाची फुले व बिया |
| ११. मूग | २३. गवत व वैरण |
| १२. वाल | २४. चारोळी] |

(यथार्थ अनुवाद)
**न. ब. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६ च्या कलम ८ अन्वये मूळ अनुसूचीऐवजी ही अनुसूची दाखल करण्यात आली.

शामुको.–एच ४–२,४५०–४.८७

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.